**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा अंतर्गत**
**गट साधन केंद्र ,पंचायत समिती लाखनी.**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलाबोडी, केंद्र-**
**केसलवाडा/वाघ् तहसील - लाखनी, जिल्हा- भंडारा.**

# नवोपक्रम

## शैक्षणिक सत्र - सन 2023-24

## --नवोपक्रमाचे शीर्षक-

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलाबोडी,
केंद्र- केसलवाडा/ वाघ, तहसील- लाखनी, जिल्हा- भंडारा
येथील वर्ग 1 ते 4 च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक साहित्याच्या
उपयोजनातून गुणवत्ता पूर्ण अध्ययन निष्पत्ती साध्य
करणे.

**दिनांक**--28 /11 /2023,


**--सादरकर्ते-**
**नरेश गंगारामजी नवखरे,**
**विषय साधनव्यक्ती**
मो.क्र-9423621048.
(nareshnawkhare@gmail.com)

१) **उपक्रमाचे शीर्षक-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलाबोडी, केंद्र- केसलवाडा/ वाघ, तहसील- लाखनी, जिल्हा- भंडारा येथील वर्ग 1 ते 4 च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक साहित्याच्या उपयोजनातून गुणवत्तापूर्ण अध्ययन निष्पत्ती साध्य करणे.

**२)नवोपक्रमाची गरज व महत्व-**

विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानावर भर देण्याच्या उद्देशाने आणि विद्यार्थ्यांचा पाया पक्का करण्याच्या मार्गातील एक भाग म्हणून, विद्यार्थ्यांना अपेक्षित भविष्यातील अध्ययन निष्पत्ती पूर्ण करता यावी म्हणून ते साध्य करण्यासाठी अधिक प्रयत्न करणे, गरजेचे असल्यामुळे नवोपक्रम निवडणे एक महत्त्वाचे कारण ठरले.

या उपक्रमाचे वेगळेपण असे आहे की,विद्यार्थी आनंददायी पद्धतीने कृतीयुक्त व दररोजच्या दैनंदिन जीवनातील पाहू शकणाऱ्या व वर्गात सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तूंबरोबर ते खेळतात आणि आपले ज्ञान प्रगट करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्याच्या संकल्पना स्पष्ट होतात, या आधारावरच विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीकडे जाण्यासाठीची उपयुक्तता पूर्ण होऊ शकते म्हणून हे नवोपक्रम करण्याचे ठरले.

**३) नवोपक्रमाची उद्दिष्टे** ः

- वर्गातील शैक्षणिक साहित्यपेटीच्या माध्यमातुन भाषेच्या / गणिताच्या विदयार्थ्यांच्या विविध क्षमतांचा विकास करणे.
- वर्गातील शैक्षणिक साहित्यपेटीच्या माध्यमातून विदयार्थ्यांच्या गणितातील गणन क्षमता व संख्यांवरील क्रियांचे संबोध दृढीकरण करणे.

- वर्गातील शैक्षणिक साहित्यपेटीचा परिसराशी संबंध जोडून विविध प्रकारची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे.
- वर्गातील शैक्षणिक साहित्यपेटीच्या माध्यमातून आनंददायी पद्धतीने विद्यार्थ्यांना ज्ञान प्राप्त करून देणे.
- वर्गातील शैक्षणिक साहित्यपेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील निरीक्षण शक्ती वाढीला लावणे.
- वर्गातील शैक्षणिक साहित्यपेटीच्या माध्यमातून विदयार्थ्यांना स्वतः निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे.

**४)नवोपक्रमाचे नियोजन-- क्षेत्र**

यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलाबोडी , तहसील - लाखनी, जिल्हा- भंडारा. या शाळेच्या वर्ग एक ते चार च्या वर्गा मध्ये असणाऱ्या 18 विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे, या सर्व विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे.**या नवोपक्रमातून मराठी भाषा/ गणित /परिसर अभ्यास /मूल्यशिक्षण या विषयांचा अभ्यास होणार आहे,**

अ) **उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण** -

मानव आणि निसर्गाचा एकमेकांशी अतूट संबंध आहे, बगीचे उद्यानात लागलेली फुले मानवी जीवनावर आपला प्रभाव टाकत असतात तसेच मनालाही प्रसन्न ठेवतात. कारण पानाफुलांचा/ रंगांचा, मानवाच्या जीवनावर भावनात्मक परिणाम होतो. तसेच शालेय वातावरणात वर्ग खोल्यांमध्ये असलेले **विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य हे विद्यार्थ्यांच्या भावात्मक जीवनाचे एक आविष्कार असून शैक्षणिक साहित्यामधील असलेली विविधता मुलांना आकर्षित करते** व विविध कल्पना विलासात ओढून नेते. वेगवेगळ्या साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा चिकित्सक दृष्टिकोन वाढीला लागल्यामुळे त्यांना शैक्षणिक साहित्याचा उपयोग

निश्चितच चांगल्या पद्धतीने करता येतो व ते आपल्या समस्या सोडवण्यासाठी याचा निश्चितच चांगला उपयोग करतात.विदयार्थ्यांना येणाऱ्या समस्या त्यांनी स्वतःच सोडवण्याची क्षमता प्राप्त व्हावी,शाळा समाज यांच्या संबंध मजबूत बनवता यावा, अध्ययन अध्यापन प्रक्रिया पूर्ण होत असताना येणाऱ्या समस्या व अडचणी वेळोवेळी सोडवल्या जाव्या इत्यादी उद्दिष्टपूर्ण कल्पनेतून शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम करण्याचा प्रयत्न केलेला आहे, व त्या अनुषंगाने कार्यवाही केलेली आहे.

ब) **संबंधित व्यक्तीशी, तज्ञांशी चर्चा**

हा उपक्रम कार्यालयीन व शाळा स्तरावरील विविध अध्ययन निष्पत्ती बाबतची कामे करत असताना विद्यार्थ्यांच्या गरजा व विद्यार्थ्यांच्या अडचणी, दैनिक शाळा भेटीत लक्षात आल्यामुळे मी राबविण्याचे ठरविले.या उपक्रमाचा फायदा सर्वच वर्ग एक ते चारच्या विद्यार्थ्यांना भाषा मराठी व गणित संख्याज्ञान यासाठी जरी होत असला तरी भविष्यात दैनंदिन अभ्यासात मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन कौशल्यामध्ये भर पडण्यासाठी याउपक्रमाचा फायदा होऊ शकतो.या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट होण्यास मदतच झाली,असा विश्वास आहे.

क) **आवश्यक साधनांचा विचार**

जीवन आनंदमय असायला हवे आहे म्हणून सारे प्रयत्न करत आहेत. प्रत्येकालाच दुःख नको आहे ,ते टाळण्यासाठीचा प्रयत्न प्रत्येक जन सातत्याने करत आहेत. पण प्रयत्न करूनही दुःख संपुष्टात येत नाही. कारण दुःखाचा नाश म्हणजे आनंद नाही. आनंदासाठी अखंड जीवन जागृतीची गरज आहे. आपण जोवर जागृतीच्या दिशेचा प्रवास करत राहू तोवरच आनंदाच्या वाटा सापडत राहतील. मात्र आपण केवळ परीस्थिती जाणून न घेता प्रवास सुरू ठेवला तर आपल्याला त्या आनंदाच्या वाटा सापडण्याची

शक्यता नाही.जागृतीचा विचार निर्माण करून पेरण्याचे काम शिक्षणातून करणा-याची गरज आहे.तोच प्रयत्न माणसांच्या जीवनात प्रकाशाची वाट निर्माण करेल. इत्यादी उद्दिष्टपूर्ण कल्पनेतून वर्गखोलीत उपलब्ध् असलेल्या शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**ड) करावयाच्या कृतीचा क्रम**

| अ.क्र. | **कृतीचा क्रम** | **शेरा** |
|---|---|---|
| 1 | **शिक्षकांबरोबबर चर्चा व विचार** | |
| 2 | **विदयार्थ्यांबरोबर कृतीयुक्त संवाद** | |
| 3 | **अपेक्षित पूर्वचाचणी** | |
| 4 | **पहिली व दुसरी,तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यातून कृतीयुक्त, आनंददायी शिक्षण देण्याची कार्यवाही करणे. विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण, वर्गीकरण ,स्वयं निर्णय, ई. क्षमतांचा विकास करणे ,विविध प्रकारच्या वस्तूंचा संग्रह करण्याची विद्यार्थ्यांची सवय वृद्धिंगत करणे,विद्यार्थ्यांचा भावात्मक विकास घडवून आणणे. विद्यार्थ्यांना अध्ययनात अभिरुची व आनंद मिळवून देणे.विद्यार्थी विविध शैक्षणिक साहित्याचे निरीक्षण करू लागतिल. विद्यार्थी स्वयं अध्ययन करू लागतील,विद्यार्थी स्वतः माहिती गोळा करू लागतील. विद्यार्थी आपल्या आवडीनुसार वेगवेगळ्या विषयासंबंधी माहिती संग्रहित करू लागतील.** | |
| 5 | **नियोजित उत्तर चाचणी घेणे.** | |
| 6 | **पूर्वानुभव व उपलब्ध् माहितीच्या आधारे निरिक्षणे व केलेल्या कार्यवाहीच्या नोंदी घेणे.** | |
| 7 | **केलेल्या कार्यवाहीच्या संकलनावर नवोपक्रम सादर करणे कार्यालयीन कार्यवाही करणे.** | |

| अ. नं | घटक | विदयार्थी कृती | शैक्षणिक साहित्य | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | **प्रकट वाचन अनुलेखन** | फ्लॅश कार्ड द्वारे अक्षरांचा सराव करणे. अक्षरे पाहून लिहिणे , अक्षर ,शब्द, असा सराव करणे,अक्षरांच्या सराव झाल्यावर शब्दांच्या सराव करणे.वेलांटी युक्त अक्षरे आणि शब्द यांचे वाचन व लेखन करणे. | वर्गातील अक्षर साहित्य व मराठी साहित्य पेटी.व गणित साहित्य पेटी, विविध रंग, झाडे | 6 दिवस |
| 2 | **श्रुतलेखन (वाचन /लेखन)** | शब्द पाहून लिहिणे.शब्द जुळवून वाक्य लिहिणे.चित्र ,शब्द ,कार्ड यांच्या मदतीने अक्षरे ओळखणे. जोडशब्द कार्डाचे लेखन करणे उकार युक्त शब्दांच्या सराव करणे.चित्रांची नावे लिहिणे | मुलांच्या वह्या व शब्दांचा संग्रहजोडाक्षरयुक्त शब्दांच्या संग्रहपेटी, ,विविध रंग ,झाडे | 6 दिवस |
| 3 | **आकलन प्रतिसाद (नियम/ आकलन)** | अनुलेखन करणे. चित्रांच्या आधार घेऊन वाक्यांची लेखन करणे.वाक्याचा सराव करणे वारंवार चिन्हांचा व जोड शब्दांचा सराव करणे.स्वरचिन्ह निवडून शब्द सराव करणे | पाठातील निवडक, वाक्य, उच्चार ,साम्य असणाऱ्या शब्दांचा संग्रह , वाक्यांचा संग्रह | 6 दिवस |
| 4 | **सारांश सांगणे (शब्दसंग्रह)** | श्रुतलेखन करणे, मजकूर वाचून शब्दांचे अर्थ लिहिणे ,लेखन करणे ,मजकुरावर आधारित सुचविलेल्या संबंधाने लिहिणे, | स्वल्पविराम पूर्णविराम, इत्यादी,वाक्यांचा संग्रह पेटी,विविध रंग, झाडे | 6 दिवस |
| 5 | **स्व - अभि व्यक्ती संवेदनशील साहित्याचा आस्वाद** | चित्रांचा वापर करून लिहिणे विषय दिला असल्यावर स्वतःचे विचार मुक्तपणे मांडणारे लेखन करणे | पाठ्यपुस्तक ,इतर पुस्तके,वर्तमानपत्र यातील परिच्छेद संग्रह | 4 दिवस |
| 6 | **व्याकरण** | शब्दांचे, नाम ,सर्वनाम, यांचे प्रकार ओळखणे फ्लॅश कार्डचा सराव करणे वाक्य करण्याचा सराव करणे | शब्दांच्या जाती, काळ, लिंग,वचन, याबाबत व्याकरण विषयक पुस्तक | 4 दिवस |
| 7 | **संपादणुक चाचणी** | मुल्यमापन साधन -निरिक्षण मुल्यामापन तंत्र --- पडताळा सुची | पुर्व चाचणी उत्तर चाचणी | 2 दिवस |

शालेय वेळात व दिवशी नवोपक्रम राबविलेला कालावधी

**दिनांक - 4/9/2023 ते दिनांक - 4/11/2023**

ई) **उपक्रमोत्तर स्थितीचे निरिक्षण**

सध्याच्या काळात लहान वयातही विद्यार्थ्यांना ताण तणाव, उदासीनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अनेक हिंसात्मक घटना, आत्महत्येचे प्रसंग अवतीभवती घडताना दिसतात. तसेच कोरोना संकटामुळे सुद्धा गेल्या काही वर्षात मानसिक स्वास्थ्य टिकविणे हे मोठे आव्हान आहे. म्हणून तर्कसंगत विचार आणि कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या तसेच करुणा, सहानुभूती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक मूल्य असणाऱ्या उत्तम मनुष्यत्वाचा विकास हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश असल्यामुळेच निश्चितच या सर्व पार्श्वभूमीवर शालेय जीवनात आनंददायी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शिक्षणातील अभिरुची वाढविणे, गळतीचे प्रमाण कमी करणे, विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम राखणे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, भावनिक, संभाषण, समस्या निराकरण तसेच ताणतणावाचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य विकसित करणे इ. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आनंददायी कृतीत विद्यार्थ्यांनी स्वतःमधील आनंदाला समजणे, तो अनुभवणे व तो आनंद मिळवता येणे ,हे या नवोपक्रमात घडून आलेले आहे.सदर नवोपक्रमात विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या ज्ञानाचे दृढीकरण अतिशय उत्तम प्रकारे यामुळे होऊ शकले, **विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या आड आपण न येता काही मर्यादेत मदत करून नवोपक्रम पुर्ण करण्यात आला आहे**.

**फ) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)**

| अ.क्र | दिनांक | केलेल्या कार्यवाहीचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | 3/7/2023 | शिक्षकांबरोबर चर्चा व विचार | |
| 2 | 14/7/2023 | विदयार्थ्यांबरोबर कृतीयुक्त संवाद<br>वर्गातील शैक्षणिक साहित्यपेटीची ओळख | |
| 3 | 14/7/2023 | **अपेक्षित वर्गनिहाय पूर्वचाचणी** | |
| 4 | 15/7/2023 ते 3/9/2023 | वर्गातीलशैक्षणिक साहित्यपेटीची, विदयाप्रवेश व सेतू अभ्यासक्रमात साहित्याचे वापराबाबत ओळख, | |
| 5 | 4/9/2023 ते 4/11/2023 | दैनंदिन अध्यापनात शैक्षणिक साहित्यपेटीची आवश्यकतेनुसार मदत,पूर्वानुभव व उपलब्ध् माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यातून कृतीयुक्त, आनंददायी शिक्षण देण्याची कार्यवाही करणे. | |
| 6 | 8/11/2023 | **नियोजित उत्तर चाचणी घेणे.** | |
| 7 | 9/11/2023 ते 24/11/2023 | पूर्वानुभव व उपलब्ध् माहितीच्या आधारे निरिक्षणे व केलेल्या कार्यवाहीच्या नोंदी घेणे. | |
| 8 | 28 /11/2023 | केलेल्या कार्यवाहीच्या संकलनावर नवोपक्रम सादर करणे व कार्यालयीन कार्यवाही करणे. | |

**भ) उपक्रमासाठी इतरांची मदत**

**विद्यार्थ्यांना लेखन कौशल्यात येणाऱ्या अडथळ्यांवर कराव्या लागणाऱ्या कृतीच्या उपायांची मालिका**

(शिक्षकांनी क्रमिक पुस्तिकेचा उपयोग करून कृतीसाठी मदत करावी.)

- कृती आधारित अध्ययन अनुभव . मुळाक्षरे, स्वरचिन्हे, काना ,वेलांटी, उकार ,मात्रा व जोडाक्षर ओळख करून द्यावी.
- जोडाक्षर परिचयासाठी सारखी जोडाक्षरे असलेल्या शब्द पट्ट्यांची निवड करा.
- पुरेशी शब्द पट्ट्यांच्या मदतीने उच्चारण्याचे पुर्व अनुभव द्यावेत.
- जोडाक्षराच्या आकाराकडे लक्ष वेधणारे उच्चारणाचा सराव करून घेणे. सुचविलेले जोडाक्षर दाखवण्यास सांगावे.
- जोडाक्षर युक्त शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे.जोडाक्षर युक्त शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.
- मुलांच्या भाव विश्वातील परिचित चित्र व शब्दांच्या मदतीने मुळाक्षरांची ओळख करून द्यावी. मुलांना परिचित चित्र आणि शब्द एकत्रित स्वरूपात निरीक्षण करावयास सांगायचे आहे
- स्वतंत्रपणे शब्द ओळखण्यास सांगावे
- शब्द पट्टी तयार करून स्वतंत्रपणे शब्द ओळखणे सांगावे
- शब्दातील अक्षरे सुट्टी करून एकमेकाचा, अक्षराचा परिचय करून द्यावा ..

- शब्द चित्रांच्या मदतीने पुरेशी अनुभव द्यावे .
- क्रिया दर्शक शब्दांच्या मदतीने खेळ घ्यावे .
- अक्षर जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार करणे ,वाचणे आणि लिहिणे .
- वाक्य वाचून प्रश्नांची उत्तरे शब्दात ,वाक्यात सांगणे आणि लिहिणे.
- वाक्यातील सुचवलेला शब्द बदलून वाक्य लिहिणे, वाचणे.
- चित्र संबंधाने शब्द, वाक्य लिहिणे.
- वर्ग 3 व 4 ला कार्य-- चित्राचे वर्णन लिहिणे.
- वर्ग निहाय सोप्या प्रश्नांची एक, दोन वाक्यात उत्तरे लिहिणे .
- परिचित मुळाक्षरांच्या मदतीने सुचविलेला शब्द तयार करायला सांगावे वाचायला , लिहायला सांगावे. वरील पद्धतीने वेगवेगळे नमुन्यातील वाक्य साच्यातील वाक्यांचे लेखन करणे.


**म) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे**

- शिक्षकांबरोबर चर्चा व विचार
- विदयार्थ्यांबरोबर कृतीयुक्त संवाद
- अपेक्षित पूर्वचाचणी
- वर्ग 1 ते 4 च्या 18 विद्यार्थ्यांना दैनंदिन अध्यापनात शैक्षणिक साहित्यपेटीची साहित्या वापराबाबत ओळख व आवश्यकतेनुसार मदत,
- पूर्वानुभव व उपलब्ध् माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यातून कृतीयुक्त, आनंददायी शिक्षण देण्याची कार्यवाही करणे.


- ➢ नियोजित उत्तर  चाचणी घेणे.
- ➢ पूर्वानुभव व उपलब्ध् माहितीच्या आधारे निरिक्षणे व केलेल्या कार्यवाहीच्या नोंदी घेणे.

## नवोपक्रमाची कार्यवाही-:

### वर्ग 1 व 2 साठी शैक्ष्.साहित्याची यादी




### वर्ग 3 व 4 साठी शैक्ष्.साहित्याची यादी




----------

## भाषा मराठी विषयासाठी

- ❖ साहित्याची ओळख करून घेणे.
- ❖ गाण्यांचा, चित्रांचा संग्रह करणे.
- ❖ गाणे ऐकवणे, त्यावर प्रश्न विचारणे.
- ❖ वाचन साहित्य, संवाद, गोष्टी सांगणे.
- ❖ नावाचे अनुलेखन करणे, नावाचे श्रुतलेखन करणे.
- ❖ वनस्पतींच्या नावांचे श्रुतलेखन, अनुलेखन करणे.
- ❖ क्रम जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार करणे.

- ❖ चित्र पाहून प्रश्नाचे उत्तर सांगणे.
- ❖ शब्दकोडेच्या माध्यमातून फुलांची नावे शोधून काढणे.
- ❖ चित्र वाचनातून पानाफुलांची/ परिसरातील वस्तूंची ओळख करून घेणे.
- ❖ विविध प्रकारच्या निसर्गातील वनस्पतीची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.
- ❖ पानाफुलांचे रंग, वास इत्यादी ओळखता येणे,
- ❖ वेगवेगळ्या रंगांचे वर्गीकरण करणे.
- ❖ भाषा मराठी विषयाचे अनुलेखन करणे
- ❖ श्रुतलेखन करणे
- ❖ गोष्ट सांगणे
- ❖ वाचलेली गोष्ट स्वतः सांगणे
- ❖ बोली भाषेतील शब्दांना प्रमाण भाषेकडे नेणे
- ❖ जोडाक्षरांचा सराव करणे
- ❖ सु वाचनाचा सराव करणे
- ❖ स्पष्ट वाचन करणे
- ❖ लिहिण्यातील होणाऱ्या चुका शोधणे

**गणित विषयासाठी**

- लहान- मोठे
- समान- सारखे
- जवळ -दूर
- कमी -जास्त
- जिकडे -तिकडे
- जेवढे- तेवढे
- मोजणे , किंमत सांगणे
- मोजा आणि जोड्या लावा

- अचूक अंकाभोवती गोल करा
- दिलेल्या अंका एवढे चित्र काढा
- योग्य जोड्या लावा
- शब्द मोजून लिहा
- अंक मोजून लिहा
- बेरीज करा
- वजाबाकी करा
- गुणाकार करा
- भागाकार करा
- अंक गाणे म्हणा. इत्यादी

**परिसर अभ्यास या विषयाबाबत**

- रंगानुसार फुलांचे वर्गीकरण करणे
- खोडांवर आणि बेलींवर येणाऱ्या फुलांची ओळख करणे
- सुगंध देणारी आणि न देणारी फुले ओळखणे.
- विविध फुलांची/ बगीच्याची नावे सांगणे.
- विविध पानाफुलांची नावे सांगणे
- ऋतू /हवामानाचे नुसार येणारी फुले ओळखणे.इत्यादी

  यामुळे मूल्यशिक्षण हे आपोआप घडून येईल.व विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, पर्यावरण संरक्षण, स्वावलंबन इत्यादी मूल्य रुजवली जातील

## ५) उपक्रमाची कार्यपद्धती

### अ) पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी

- ❖ प्रथमतः विद्यार्थ्यांच्या लहान लहान कृतीयुक्त स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामुळे विविध मनोरंजनात्मक खेळ सुरुवातीलाच घेतल्यामुळे विद्यार्थी आनंदाने यात सहभागी झाले होते.
- ❖ विद्यार्थ्यांच्या अंत्याक्षरी स्पर्धा, शाब्दिक स्पर्धा ,नाव सांगण्याच्या स्पर्धा, शेवटच्या नावावरून कराव्या लागणाऱ्या नव्या नावाची सुरुवात ही स्पर्धा, यामुळे खेळाची रुची निर्माण झाली .
- ❖ शब्दकोड्यांच्या माध्यमातून शब्द संपत्ती वाढवत असताना विविध वनस्पती, निसर्गातील वनस्पती, यांची नावे माहीत झाली. त्यानुसार साहित्याचा परिचय झाला.
- ❖ गावाच्या परिसरात असलेल्या विविध वनस्पती ,सभोवताच्या सर्व गोष्टी विद्यार्थी अनुभवातून ओळखायला लागले.
- ❖ विद्यार्थी शिक्षकांशिवाय आपल्या कार्यात सतत गुंतून राहत होते.
- ❖ विद्यार्थी अध्ययनशील बनल्यामुळे आपोआपच त्यांना या उपक्रमात शैक्षणिक साहित्याची रुची वाढली.
- ❖ नवोपक्रमाच्या कार्यवाही दरम्यान विद्यार्थ्यांचा कृतिशील सहभाग व आनंददायी शिक्षण यामुळे अभ्यासाचा वेग वाढला.त्यातूनच क्षमता विकास वाढीला लागला.

ब) **कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन**

हा नवोपक्रम वर्ग 1 ते 4 च्या 18 विद्यार्थ्यांना चार वर्गासाठी घेण्यात आला आणि विविध अनुभवाच्या आधारावर खालील निरीक्षणे आणि नोंदी केल्या गेल्या.

**पूर्व चाचणी**

- पूर्व चाचणीत एकूण अठरा (18) विद्यार्थ्यांपैकी 0 ते 30 % टक्के पर्यंत 01 विद्यार्थी 31 ते 50 % टक्के पर्यंत 14 विद्यार्थी 51 ते 75 % टक्के पर्यंत 03 विद्यार्थी 76 ते 100 % टक्के पर्यंत 00 विद्यार्थी अशी विदयार्थी गुणवत्ता स्थिती होती.

- पूर्व चाचणीत एकूण अठरा (18) विद्यार्थ्यांपैकी 50 टक्केपेक्षा अधिक गुण घेणारे 17% टक्के विद्यार्थी होते. वर्गामध्ये 40% ते 50 % टक्के पर्यत गुण घेणारे 42 % विद्यार्थी होते आणि **वर्गामध्ये 40% पर्यत गुण घेणारे 41 % विद्यार्थी** होते.
- ही टक्केवारी पुढे उत्तर चाचणीमध्ये वाढविणे हे ध्येय होते.
- विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याची ओळख करताना भीती निर्माण होईल असे वाटत होते,
- अवघड शब्द स्पष्ट बोलू शकत नव्हते.
- सभाधिटपणा नव्हता.

विदयार्थी गुणवत्ता स्थिती दर्शक तक्ता

| चाचणी | 0 ते 30 % | 31 ते 50 % | 51 ते 75 % | 76 ते 100 % | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| पूर्व | 01 | 14 | 03 | 00 | |
| उत्तर | 00 | 01 | 17 | 00 | |

क) **उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरिक्षणे व त्यांच्या नोंदी**

**उत्तर चाचणी**

- उत्तर चाचणीत एकूण अठरा (18) विद्यार्थ्यांपैकी 0 ते 30 % टक्के पर्यंत 00 विद्यार्थी, 31 ते 50 % टक्के पर्यंत 01 विद्यार्थी, 51 ते 75 % टक्के पर्यंत 17 विद्यार्थी, 76 ते 100 % टक्के पर्यंत 00 विद्यार्थी अशी विदयार्थी गुणवत्ता स्थिती आहे.
- उत्तर चाचणीत एकूण अठरा (18) विद्यार्थ्यांपैकी 50 %टक्केपेक्षा अधिक गुण घेणारे 95 % टक्के विद्यार्थी आहेत. वर्गामध्ये 40% ते 50 % टक्के पर्यत गुण घेणारे 05 % विद्यार्थी आहेत.
- प्रगतीची **टक्केवारी वाढून उर्ध्वगामी झाली**,ध्येय गाठता आले.
- विद्यार्थी आत्मविश्वासाने शैक्षणिक साहित्याचे आधारे भाषा मराठी मधिल वाक्य,शब्द, व संख्याज्ञानावर आधारित संख्यावरील क्रिया, संख्या इत्यादी सहज बोलू लागले.
- विद्यार्थ्यांच्या उच्चारात, अनुलेखनात व श्रुतलेखनात वाढ झाली.

- ❖ त्यांचात सभाधीटपणा वाढीला लागला.
- ❖ शाळेत नियमित येऊन कृतीयुक्त व आनंददायी शिक्षणामुळे त्यांची कल्पकता निश्चितच वाढीला लागली.

**ड) कार्यवाही करताना आलेल्या अडचणी**


हा नवोपक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यार्थी ग्रामीण भागातील असून आपल्याला ते सहकार्य करू शकतील का? असे वाटत होते, मात्र त्यांना शैक्षणिक साहित्य हाताळण्याची कल्पना व्यवस्थित समजली व आनंददायी आणि कृतीशील पद्धतीने शिकणे असल्यामुळे त्यांना एक प्रकारे आनंद झाला- मजा आली. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक साहित्य तोडली जातील , यामुळे कोणी काही म्हणेल का? अशी भीती सुद्धा वाटत होती. त्याचप्रमाणे साहित्य आणण्यासाठी विद्यार्थी अल्पाकाळासाठी ईकडे- तिकडे बाहेर गेल्यावर ते सुरक्षित येईपर्यंत काळजी वाटत होती, अशा प्रकारे साधारण अडचणी असल्या तरी त्यात जबाबदारी होती,.मात्र,श्री वाय.आर.मेश्राम सर,मुख्याधापक,श्री.गजीराम खंडाते सर सहा.शिक्षक यांच्या सहकार्यामुळेच फारशा अडचणी आलेल्या नाहीत.

## आ) माहितीचे विश्लेषण:- आलेख,तक्ते (आवश्यक वाटल्यास)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलाबोडी, केंद्र- केसलवाडा /वाघ ,

तह- लाखनी, जिल्हा- भंडारा.

| अ क्र | विदयार्थ्यांचे नांव | विदयार्थ्यांचे आईचे नांव | वर्ग | पूर्व चाचणी 25गुण | शेकडा प्रमाण टक्केवारी | उत्तर चाचणी 25गुण | शेकडा प्रमाण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रद्धा विलास वरकडे | मालू | 1 | 12 | 48 | 17 | 68 |
| 2 | वंशिका भागवत कोडापे | सुनंदा | 1 | 13 | 52 | 18 | 72 |
| 3 | अवनी ओमप्रकाश मेश्राम | हर्षा | 1 | 12 | 48 | 15 | 60 |
| 4 | प्रिन्स राजू सपाटे | बेबीनंदा | 2 | 11 | 44 | 18 | 72 |
| 5 | शिवण्या चंद्रकुमार कुंभरे | सविता | 2 | 10 | 40 | 15 | 60 |
| 6 | रिया राजेंद्रा वरकडे | देवांगना | 2 | 10 | 40 | 17 | 68 |
| 7 | अंकिता रमेश भंडारी | तारा | 3 | 10 | 40 | 17 | 68 |
| 8 | अनन्या आशिष वरठे | कुंदा | 3 | 8 | 32 | 15 | 60 |
| 9 | समीक्षा कैलास वरखडे | ममता | 3 | 12 | 48 | 16 | 64 |
| 10 | स्वाती रवींद्र वरखडे | कल्पना | 3 | 13 | 52 | 18 | 72 |
| 11 | प्रेम राजेंद्र वरकडे | देवांगना | 3 | 13 | 52 | 16 | 64 |
| 12 | रुद्र गंगाधर कळपाते | माया | 3 | 11 | 44 | 16 | 64 |
| 13 | प्रशांत कैलास कुंभरे | रूपाली | 3 | 9 | 36 | 15 | 60 |
| 14 | यश नितेश कुंभले | सपना | 3 | 12 | 48 | 17 | 68 |
| 15 | अंशू देवदास मेश्राम | मंगला | 3 | 7 | 28 | 10 | 40 |
| 16 | उर्यवंश भागवत कोडापे | सुनंदा | 4 | 12 | 48 | 16 | 64 |
| 17 | श्रेया विलास वरकडे | मालू | 4 | 10 | 40 | 16 | 64 |
| 18 | निरंजन श्रीकृष्ण मेश्राम | नीतू | 4 | 12 | 48 | 15 | 60 |




वर्ग/विदयार्थी गुणवत्ता स्थिती दर्शक तक्ता

| चाचणी | 0 ते 30 % | 31 ते 50 % | 51 ते 75 % | 76 ते 100 % | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| पूर्व | **01** | **14** | **03** | **00** | |
| उत्तर | **00** | **01** | **17** | **00** | |

**६) उपक्रमाची यशस्विता/ फलनिष्पत्ती (उद्दिष्टानुसार)**

यामुळे या उपक्रमाची यशस्वीता खालील प्रमाणे दिसून आली .

- विद्यार्थ्यांना अध्ययनात अभिरुची निर्माण झाली व आनंद प्राप्त झाला.
- विद्यार्थी विविध शैक्षणिक साहित्याचे निश्चितच निरीक्षण करू लागले.
- विद्यार्थी स्वयं अध्ययन करू लागले,विद्यार्थी स्वतः माहिती गोळा करू लागले.
- विद्यार्थी आपल्या आवडीनुसार शैक्षणिक साहित्याचे विविध प्रकारे फळे, पाने, भाजीपाला, चित्रसंग्रह अशा वेगवेगळ्या विषयासंबंधी माहिती संग्रहित करू लागले.
- कविता गायन, संभाषण, प्रश्नोत्तरे ,गणितीय क्रिया, मापन क्षमता इत्यादी विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थी प्रतिसाद देऊ लागले.अभिरुची वाढीला लागली.
- विद्यार्थ्यांच्या शब्द संग्रह वाढीला लागला. उपक्रमाच्या माध्यमातून अध्ययन अध्यापन प्रक्रिया परिणामकारक झाली.
- पाठ्यपुस्तका व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना ज्ञान प्राप्त झाले.
- स्वयं अध्ययन करण्याची विद्यार्थ्यांमध्ये क्षमता निर्माण झाली.
- कोणत्याही विषयाला विविध पैलूंनी पाहण्याची विद्यार्थ्यांची क्षमता दिसून आली.
- विद्यार्थ्यांची सर्जनशीलता , कल्पनाशक्ती जागृत झाली.
- विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास झाला.
- स्वयं अध्ययनामुळे विद्यार्थ्यांना अध्ययनात आनंद प्राप्त झाला.
- शिक्षण प्रक्रिया स्वयं स्फूर्तीने झाली.

- माहिती एकत्रित करणे, वर्गीकरण करणे, निरीक्षण करणे इत्यादी क्षमता विद्यार्थ्यांनी ग्रहण केल्या, यामुळे वैज्ञानिक आणि शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण झाला.
- सर्वांनी एकत्रित कार्य केल्यामुळे सहकार्य करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली.
- एकमेकांच्या आदर करणे, जबाबदारी स्वीकारणे, आणि शैक्षणिक साहित्याचे विषयी आवड  निर्माण झाल्याचे दिसून आले.

❖ **हा नवोपक्रम का करावा**? (**या नवोपक्रमाचा फायदा** )

❖ विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानावर भर देण्याच्या उद्देशाने आणि विद्यार्थ्यांचा पाया पक्का करण्याच्या मार्गातील एक भाग म्हणून, विद्यार्थ्यांना अपेक्षित भविष्यातील अध्ययन निष्पत्ती पूर्ण करता यावी म्हणून ते साध्य करण्यासाठी अधिक प्रयत्न करणे, गरजेचे असल्यामुळे **नवोपक्रम निवडणे शिक्षण क्षेत्रातिल प्रत्येकासाठी एक महत्त्वाचे साधन आहे**.

❖ **या उपक्रमाचे वेगळेपण असे आहे की**,विद्यार्थी आनंददायी पद्धतीने कृतीयुक्त व दररोजच्या दैनंदिन जीवनातील पाहू शकणाऱ्या व  वर्गात सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तूंबरोबर ते खेळतात आणि आपले ज्ञान प्रगट करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्याच्या संकल्पना स्पष्ट होतात, या आधारावरच विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीकडे जाण्यासाठीची उपयुक्तता पूर्ण होऊ शकते **म्हणून  हा नवोपक्रम  करावा**.

❖ तर्कसंगत विचार आणि कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या तसेच करुणा, सहानुभूती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक मूल्य असणाऱ्या उत्तम मनुष्यत्वाचा विकास हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश असल्यामुळेच निश्चितच या सर्व पार्श्वभूमीवर शालेय जीवनात आनंददायी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शिक्षणातील अभिरुची वाढविणे, गळतीचे प्रमाण कमी करणे,

विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम राखणे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, भावनिक, संभाषण, समस्या निराकरण तसेच ताणतणावाचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य विकसित करणे इ. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आनंददायी कृतीत विद्यार्थ्यांनी स्वतःमधील आनंदाला समजणे, तो अनुभवणे व तो आनंद मिळवता येणे ,हे या नवोपक्रमात घडून आलेले आहे.**म्हणुन हा नवोपक्रम करावा**.

- ❖ सदर नवोपक्रमात विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या ज्ञानाचे दृढीकरण अतिशय उत्तम प्रकारे यामुळे होऊ शकले,विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या आड आपण न येता, काही मर्यादेत मदत करून नवोपक्रम पुर्ण करण्यात आला आहे.**हा या नवोपक्रमाचा फायदा आहे**.
- ❖ या **नवोपक्रमाचे फायदे असे आहेत** की, विद्यार्थ्यांच्या आनंददायी कृतीयुक्त शिक्षणामुळे विद्यार्थी सहज शिकू लागला एकूण विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणीत एकूण अठरा (18) विद्यार्थ्यांपैकी 50 टक्केपेक्षा अधिक गुण घेणारे 17% टक्के विद्यार्थी होते. वर्गामध्ये 40% ते 50 % टक्के पर्यत गुण घेणारे 42 % विद्यार्थी होते आणि वर्गामध्ये 40% पर्यत गुण घेणारे 41 % विद्यार्थी होते.
- ❖ उत्तर चाचणीत एकूण अठरा **(18)** विद्यार्थ्यांपैकी **50 %**टक्केपेक्षा अधिक गुण घेणारे 95 % टक्के विद्यार्थी आहेत. वर्गामध्ये **40%** ते **50 %** टक्के पर्यत गुण घेणारे **5 %** विद्यार्थी आहेत.
- ❖ प्रगतीची टक्केवारी वाढून उर्ध्वगामी झाली,ध्येय गाठता आले
- ❖ वर्गातील **शंभर टक्के विद्यार्थी प्रगत** झाले. यावरून आपल्याला असे निदर्शनास येते की सदर उपक्रमाच्या माध्यमातून काही दिवसात आपण वर्गाची गुणवत्ता वाढवण्यासाठी यशस्वी झालो.
- ❖ हाच उपक्रम केंद्रांतर्गत विविध शाळांमध्ये राबवला गेला तर केंद्रातील व तालुक्यातील विविध विद्यार्थ्यांना याचा प्रभावीपणे वापर करून अतिउच्च

गुणवत्ता प्राप्त करता येईल व आनंददायी पद्धतीने शिकता येईल म्हणून या नवोपक्रमाचा जास्तीत जास्त फायदा होऊ शकेल.

**७) समारोप** --

शालेय जीवनात आनंददायी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शिक्षणातील अभिरुची वाढविणे, गळतीचे प्रमाण कमी करणे, विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम राखणे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, भावनिक, संभाषण, समस्या निराकरण तसेच ताणतणावाचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य विकसित करणे इ. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आनंददायी कृतीत विद्यार्थ्यांनी स्वतःमधील आनंदाला समजणे, तो अनुभवणे व तो आनंद मिळवता येणे ,हे या नवोपक्रमात घडून आलेले आहे.सदर नवोपक्रमात विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या ज्ञानाचे दृढीकरण अतिशय उत्तम प्रकारे यामुळे होऊ शकले,**विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या आड आपण न येता काही मर्यादेत मदत करून नवोपक्रम पुर्ण करण्यात आला आहे**.

- ## ८) संदर्भसूची
- बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009
- भारत सरकारच्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) विषयक मार्गदर्शक सूचना
- निपुण भारत अभियान अंमलबजावणी बाबत शासन निर्णय संकीर्ण / 2021/ प्र क्र. 179/एस डी 6 दिनांक--27 ऑक्टोबर 2021
- मा.उपसंचालक,शालेय शिक्षण,नागपूर यांचे अध्ययन अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करण्याबाबत पत्र क्रमांक/ शिउसं/ परिपत्रक/8615/2023 दिनांक-3/11/2023
- शिकू दे आनंदे , गोष्टीचा शनिवार,विद्यार्थी कृतिपुस्तिका, करू या मैत्री विज्ञानाशी, गणिताशी किंवा अन्य विषयाशी या बाबतचे प्रकाशित साहित्य व कृतिपुस्तिका याशिवाय

1) स्वतःचे अनेक उपक्रमशील पूर्वानुभव

2) विविध खेळ व ज्ञानरचनावादी कृती इत्यादी बाबत वेळोवेळी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र, पुणे यांनी प्रकाशित केलेले शाळा स्तरावरील साहित्य व जीवनशिक्षण अंकातील वाचनिय साहित्य

3) शालेय शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक,संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र, पुणे यांनी आपल्या स्तरावरून वेळोवेळी शाळा स्तरावर राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमाबाबत पाठविलेले परिपत्रक, सूचना, पत्रके इत्यादी

**सहपत्र**

**अ) शाळेच्या मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र**

**ब) स्पर्धकाचे प्रतिज्ञापत्र**

**क) नवोपक्रम कार्य गुगल व्हीडीओ लिंक URL**

**https://www.youtube.com/watch?v=4HXSGwuMijc**

**ड) फोटो - 6 कॉपी**

**ई) इतर**

9) **परिशिष्टे**

**पूर्व चाचणी प्रश्नसंच**

**उत्तर चाचणी प्रश्नसंच**

# पूर्व चाचणी / उत्तर चाचणी

**वेळ- 2 तासीका          वर्ग 1 ला          एकुण गुण- 25**

प्रश्न 1- खालील अक्षरे जसेच्या तसे पाहून लिहा.
(5 गुण)

म ------ ख ----- झ ------- ढ ------ य ------

प्रश्न 2- खालिल आवाजाचे चित्र ओळखा. (5 गुण)

चिव-चिव, काव-काव, डराव-डराव,

कुकू-ककू, हंबा

प्रश्न 3- खालील शब्द पाहून लिहा (5 गुण)

मासा -------,पालक -------, लसूण --------

बैल ---------, बकरी ---------

प्रश्न 4 -1ते 25 पर्यतच्या संख्या ओळखा (तोंडी 5 गुण)

14 17 9 23 20

प्रश्न - 5 - आपले पुर्ण नांव लिही. (5 गुण)

----------------------------------------------


--------------------------**********------------------------

## पूर्व चाचणी / उत्तर चाचणी

वेळ- 2 तासीका        वर्ग 2 रा        एकुण गुण- 25

प्रश्न 1- खाली दिलेल्या अक्षरापासून पांच अर्थपुर्ण शब्द बनवा.
(5गुण)

म---



प्रश्न 2- पाळीव प्राणी व जंगली प्राणी ओळखा. (5गुण)

गाय,म्हैस,वाघ,कोल्हा,हत्ती,सिंह,मांजर,बकरी,कुत्रा

पाळीव प्राणी ------------------------------------------------

जंगली प्राणी -------------------------------------------------

प्रश्न 3 - लहान  मोठी संख्या ओळखा ( तोंडी 5 गुण)

34 --- 48        87 ----- 92

58 ----- 38        42 ----- 84        02 ------- 12

प्रश्न 4 – बेरिज करा. (5गुण)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 58 | 84 | 123 | 38 | 64 |
| +58 | +12 | +321 | +87 | +52 |
| ----------- | ---------- | ---------- | ----------- | -------- |

प्रश्न 5—खालिल संख्या चढत्या क्रमाने लिहा ( 5 गुण )

90   07   87   78   64   90   45

------------------------------*****---------------------------------

# पूर्व चाचणी / उत्तर चाचणी

वेळ- 2 तासीका वर्ग 3 रा एकुण गुण- 25

प्रश्न 1- खालील चित्रावरून गोष्ट तयार करा. (5गुण)



______________________________

______________________________

______________________________

______________________________

प्रश्न 2- वजाबाकी करा. (4गुण)

| | | | |
|---|---|---|---|
| 312 | 667 | 505 | 198 |
| -257 | -122 | - 078 | - 102 |
| ----------- | ---------- | ---------- | ----------- |

प्रश्न 3- खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा (10गुण)

1) भारताची राजधानी कोणती? ------------
2) महाराष्टाची राजधानी कोणती? --------------
3) महाराष्टात किती जिल्हे आहेत? --------------
4) आपण कोणत्या जिल्हयात राहत आहात? ---------------
5) आपल्या शाळेचे नांव लिहा? -----------------

प्रश्न 4 – ऋतू ओाळखा (3गुण)

1) थंडी लागणे? ------------
2) पाउस पडणे? --------------
3) उष्षता होणे? --------------

प्रश्न - 5 – संगित वादयांची तीन नांवे लिही. (3गुण)

------------ ------------- -------------- ------------

-------------------------------------***-------------------------------------------

## पूर्व चाचणी / उत्तर चाचणी

## वेळ- 2 तासीका वर्ग 4था एकुण गुण- 25

प्रश्न 1- दिशाचक्र काढून मुख्य दिशा व उपदिशा दाखवा, नांवे लिहा (5 गुण)

प्रश्न 2- मानवाचे पंचेद्रिये सांगुन त्यांचे कार्य लिहा (5गुण)

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

प्रश्न 3 - भागाकार करा. (5गुण)


1) 609 भागिले12
2) 999 भागिले 22
3) 887 भागिले 14
4) 452 भागिले 13

प्रश्न 4 – गुणाकार करा. (5गुण)

1) 382 गुणिले 14
2) 252 गुणिले 17
3) 505 गुणिले 52
4) 609 गुणिले 58

प्रश्न 5 - आपणांस कल्पना असलेला सुर्योदयाचा देखावा तयार करणारी गोष्ट लिहा. (5गुण)

--------------------------------------*****----------------------------------








1)नवोपक्रम सुरू केला 2)विदयार्थी संबोध कृती 3) विदयार्थी कृती








अ) विदयार्थी क्षमतावृध्दी

ब) विदयार्थी सहभाग कृती

क) विदयार्थी शैक्षणिक साहित्य संबोध व पूर्व चाचणी (निरिक्षण कृती)

# शाळाभेट नोंद अभिप्राय



दि. ८/११/२०२३
कॅम्प- जि. प. प्रा. शा. चिखलाबोडी
केंद्र - केसलवाडा/वाघ. पं.स. लाखनी
जि. भंडारा. (महाराष्ट्र राज्य)

नवोपक्रम सन २०२३-२४


विषय - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलाबोडी, केंद्र- केसलवाडा/वाघ. पं.स. लाखनी जि. भंडारा येथील वर्ग १ ते ४ च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक साहित्याच्या उपयोजनातून गुणवत्तापूर्ण अध्ययन निष्पत्ती साध्य करणे.

उपक्रम सुरू - १४/६/२०२३
पूर्वचाचणी - १४/६/२०२३
उत्तर चाचणी - ८/११/२०२३
सहभागी विद्यार्थी - १८
वर्ग १ - ०+३=०३
वर्ग २ - १+२=०३
वर्ग ३ - ४+५=०९
वर्ग ४ - ०+३=०३

विषय - भाषा (मराठी), गणित [illegible] परिसर अभ्यास या विषयावर काम करण्यात आले.

सहकार्य - श्री वाय. आर. मेश्राम, मुख्याध्यापक
- श्री जी. के. खंडारे [illegible]
जि. प. प्रा. शा. चिखलाबोडी.

मुख्याध्यापक
जि.प.प्राथ.शाळा चिखलाबोडी,
पं.स.लाखनी,जि.भंडारा




नवोपक्रम शै. सत्र २०२३-२४
विद्यार्थ्यांची यादी
शाळा- जि.प. प्राथ. शाळा चिखलाबोडी केंद्र- केसलवाडा/वाघ
पं.स. लाखनी जि. भंडारा

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव | जन्मतारीख | आईचे नाव | वर्ग | दाखल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कु. श्रेया विलास वरकडे | २२/१/२०१६ | भावु | १ ला | १५३ |
| 2 | " वैष्णवी भागवत कोडापे | १४/३/२०१६ | सुनंदा | " | १५४ |
| 3 | " आरती ओमप्रकाश मेश्राम | १/१०/२०१६ | हर्षा | " | १५५ |
| 4 | प्रिंस राजु ससाटे | २६/८/२०१६ | लेखनिंदा | २ रा | १५० |
| 5 | कु. शिवन्या चंद्रकिरण कुंभरे | ८/११/२०१६ | सविता | " | १४९ |
| 6 | " रिया राजेंद्र वरकडे | २१/६/२०१६ | देवांगना | " | १५२ |
| 7 | " अंकिता रमेश भंडारी | २६/१०/२०१५ | तारा | ३ रा | १४० |
| 8 | " अनन्या आशिष वरठे | ३३/१२/२०१६ | कुंदा | " | १४१ |
| 9 | " सानिका कैलास वरकडे | १८/३/२०१४ | ममता | " | १४२ |
| 10 | " स्वाती रविंद्र वरकडे | ८/१०/२०१४ | कल्पना | " | १४३ |
| 11 | प्रेम राजेंद्र वरकडे | २१/१२/२०१४ | देवांगना | " | १४४ |
| 12 | रुद्र गंगाधर कढ़पाते | १६/६/२०१४ | माया | " | १४५ |
| 13 | प्रशांत कैलास कुंभरे | १०/१०/२०१४ | रुपाली | " | १४६ |
| 14 | यश नितेश कुंभले | २३/११/२०१४ | सपना | " | १४७ |
| 15 | कु. आरु देवदास मेश्राम | २१/६/२०१४ | मंगला | " | १४८ |
| 16 | उर्वशी भागवत कोडापे | ११/१/२०१४ | सुनंदा | ४ था | १३६ |
| 17 | श्रेष विलास वरकडे | २५/८/२०१४ | भावु | " | १३५ |
| 18 | निरंजन श्रीकृष्ण मेश्राम | १८/६/२०१४ | नितु | " | १३९ |

मुख्याध्यापक
जि.प.प्राथ.शाळा चिखलाबोडी,
पं.स.लाखनी,जि.भंडारा

# शाळेच्या मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र




प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/डॉ. भोजराज मोतीरामजी नवखरे हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला जि. प. प्रा. शा. चिखलाबोडी, केंद्र केसलवाडा येथील वर्ग १ ते ४ च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक उपयोजनातून गुणवत्तापूर्ण अध्ययन निष्पत्ती साध्य करणे हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व-परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : ८/११/२०२३
स्थळ : चिखलाबोडी

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी
नाव श्री. वाय. आर. मेश्राम
मुख्याध्यापक
शिक्का: जि.प.प्राथ.शाळा चिखलाबोडी,
पं.स.लाखनी,जि.भंडारा

# स्पर्धकाचे प्रतिज्ञापत्र




**प्रतिज्ञापत्र**

मी श्री/श्रीमती/डॉ. [illegible] प्रतिज्ञापत्र लिहून देतो/ देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला [illegible] हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमावर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : [illegible]
स्थळ : [illegible]

स्पर्धकाची स्वाक्षरी
नाव : [illegible]
शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.



नरेश नवखरे

(नवोपक्रम सादरकर्ते)

प्रतिलिपी/आभार --


1) माननीय प्राचार्य सर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था भंडारा

2) माननीय शिक्षणाधिकारी सर,(प्रा) जि.प.भंडारा

3) मा.गटशिक्षणाधिकारी सर, पंचायत समिती लाखनी

4) मा.मुख्याध्यापक सर व चमू जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलाबोडी, केंद्र- केसलवाडा/वाघ् तहसील - लाखनी, जिल्हा- भंडारा व चमू

यांना माहितीसाठी व नवोपक्रम स्पर्धा शैक्षणिक सत्र - सन 2023-24 च्या नामांकनासाठी सविनय सादर.



नरेश नवखरे

(नवोपक्रम सादरकर्ते)